आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०५ ऑक्टोबर २०२५

ठळक बातम्या

1. राज्यातल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदत देण्याचं गृहमंत्री अमित शाह यांचं आश्वासन.

2. संविधान सत्याग्रह पदयात्रेमुळे जनाधार वाढत असल्याचं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचं प्रतिपादन.

3. शेष भारताचा पराभव करत विदर्भाने तिसऱ्यांदा जिंकला इराणी चषक.

4. नवी दिल्लीत सुरु असलेल्या दिव्यांगांसाठीच्या अथलेटिक्स स्पर्धांमधे भारताची पदक संख्या १८ वर.

5. शक्ती चक्रीवादळाच्या प्रभावामुळे राज्यात अनेक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता.

अमित शाह दौरा

राज्यातल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार सर्वतोपरी मदत देईल असं आश्वासन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिलं आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात लोणी इथं शेतकरी मेळाव्याला ते संबोधित करत होते -

*मैंने मोदी जी की ओर से उनको आश्वस्त किया है कि महाराष्ट्र सरकार हमें डिटेल्ड रिपोर्ट भेज दे, मोदी जी महाराष्ट्र के किसानों की मदद करने में ज़रा भी देर नहीं लगाएं।*

शेतकऱ्यांना उत्पन्नाचं आणखी साधन मिळावं याकरता सहकारी साखर कारखान्यांनी गाळप चालू नसताना इथेनॉल तसंच भाजीपाला आणि इतर उत्पादनांसाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन अमित शहा यांनी केलं. प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याच्या विस्तारित परिसराचं उद्घाटन आज शहा यांच्या हस्ते झालं. तसंच पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण त्यांनी केलं. याशिवाय देशातला पहिला सहकारी कॉम्प्रेस बायो गॅस प्रकल्प आणि स्प्रे ड्रायर पोटॅश ग्रेन्युएल प्रकल्पाचं उदघाटन देखील त्यांच्या हस्ते झालं.

<u>शरद पवार</u>

महाराष्ट्रात सध्या पूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून लवकरात लवकर मदत कशी करता येईल यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नेते शरद पवार यांनी केली. पुण्यामध्ये ते माध्यमांशी बोलत होते.

<u>हर्षवर्धन सपकाळ</u>

लोकशाहीचा आग्रह धरण्यासाठी दिनांक २८ सेप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान आम्ही काढलेली संविधान सत्याग्रह पदयात्रा यशस्वी राहिली आणि आमचा जनाधार वाढत आहे असं प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलं. ते आज नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. राष्ट्रीय स्वयं सेवक संघाच्या पुढच्या वर्धापन दिनापर्यंत अशी पदयात्रा आम्ही राज्यभर काढणार असून, संघ विसर्जित करावा आणि संघानं आपलं रजिस्ट्रेशन करावं अशी आमची मागणी असल्याचं सपकाळ म्हणाले. महात्मा गांधी हे जगभरात भारतीय तत्वज्ञानाचे वारसदार म्हणून ओळखले जातात मात्र भगत सिंग आणि महात्मा गांधींच्या संबंधांबद्दल गैरसमज पसरवले गेलेत असंही सपकाळ म्हणाले. याचवेळी त्यांनी शेतकऱ्यांसाठी संपूर्ण कर्जमाफीची मागणी केली.....

*मात्र शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये पॅकेज हे घोषित करा. पडून गेलेल्या जमिनीच्या अनुषंगाने ५ लाख जाहीर करा आणि कर्ज माफीची घोषणा करा. म्हणजे दिल्लीला हि जेव्हा गेले देवेंद्र फडणवीस तिथे जाऊन सुरजागडची चर्चा केली मात्र शेतकऱ्याच्या अनुषंगानं आपण कोणतंही पॅकेज आणण्यामधे यशस्वी होत नाही.*

<u>दुर्गावती जयंती</u>

यवतमाळ मध्ये आदिवासी विकास विभागाच्या वतीनं पहिल्यांदाच विरांगना महाराणी दुर्गावती यांची ५०१ वी जयंती जाहीर कार्यक्रमाद्वारे साजरी करण्यात आली. नियोजन सभागृहात आयोजित या कार्यक्रमात पालकमंत्री संजय राठोड आणि आदिवासी विकास मंत्री अशोक उईके प्रामुख्याने उपस्थित होते. आदिवासी महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी आदिवासी विकास विभागाने विद्यार्थी आणि महिला याना केंद्रबिंदू ठेवून मिशन मोडवर काम सुरू केलं असल्याचं मंत्री अशोक उईके यांनी यावेळी सांगितलं-

*आदिवासी विकास मंत्री म्हणून झाल्यानंतर दोन संकल्प केले मी विद्यार्थी आणि विद्यार्थींनी आणि आमच्या बहिणी हजारो महिला बचतगट जोपर्यंत सबलीकरण आणि सक्षमीकरण*

*होणार नाही. बिनव्याजी कर्ज मोफत मिळणार नाही आता त्यांनी सांगितलं 15 टक्के 100 टक्के आदिवासी विभाग भरणार आहे एकही रुपया महिला भरणार नाही नियोजन केलेल आहे.*

<u>कफ सिरप बैठक</u>
राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये कफ सिरपच्या सेवनानं काही मुलांचे मृत्यू झाल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्यांच्या आरोग्य सचिवांची बैठक बोलावली आहे. आरोग्य मंत्रालयाच्या सचिवाच्या अध्यक्षतेखाली आज ही बैठक होणार असून सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, आरोग्य सचिव यात सहभागी होणार आहेत. तसंच औषध नियंत्रक देखील सहभागी होतील. दूरदृश्यप्रणालीद्वारे होणाऱ्या या बैठकीत कफ सिरपचा गैरवापर तसंच औषधांची गुणवत्ता यावर चर्चा होणार आहे. दरम्यान, दोन वर्षांहून कमी वयाच्या बालकांना सर्दी- खोकल्याची औषधं दिली जाऊ नयेत, अशा सूचना केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं काल सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना दिल्या.

<u>सुधाकर अडबाले</u>
राज्यातील शालेय शिक्षण, उच्च आणि तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, इतर मागास बहुजन कल्याण आणि कौशल्य व उद्योजकता विभागाअंतर्गत कार्यरत आणि सेवानिवृत्त सर्व शिक्षक, प्राध्यापक, सर्व निदेशक तसेच कर्मचारी यांचे ऑक्टोबरचे वेतन दिवाळीपूर्वी अदा करण्यात यावे, अशी मागणी नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, इतर मागास बहुजन कल्याण व कौशल्य व उद्योजकता विभागाच्या प्रधान सचिवांकडे केली आहे. सदर वेतन तरतूद तात्काळ उपलब्ध करून द्यावी आणि दिवाळीपूर्वी वेतन अदा करण्याबाबत संबंधितांना आदेश निर्गमित करण्यात यावे असही अडबाले म्हणाले.

<u>राष्ट्रसेविका समिती अमरावती</u>
राष्ट्र वैभवशाली व्हावे म्हणून कार्य करणाऱ्या सेविका जिथे एकत्रित येतात आणि चारित्र्य निर्माण करण्याचे कार्य प्रामाणिकपणे करतात तीच राष्ट्रसेविका समिती होय. स्वयंप्रेरणेने कार्य करणारी ही महिला संघटना आज 90 व्या वर्षात पदार्पण करीत असल्याचा अभिमान आहे, असे प्रतिपादन राष्ट्रसेविका समितीच्या अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्या व महिला समन्वयाच्या सहसंयोजिका भाग्यश्री साठ्ये यांनी केले.
राष्ट्रसेविका समिती अमरावती महानगराचा विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजन कार्यक्रम शनिवारी सायंकाळी श्री समर्थ हायस्कूलच्या प्रांगणात आयोजिण्यात आला होता. त्यावेळी त्या मुख्य वक्ता म्हणून बोलत होत्या.

संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला 100 वर्ष पूर्ण झाल्याच्या अनुषगाने वाशीम शहरात आज  4 वाजता शहरातून पथसंचलन करण्यात आले. यावेळी ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पवृष्टी करत स्वयंसेवकांचे स्वागत केले.

इराणी चषक

प्रथम वर्ग क्रिकेट मध्ये नागपूर इथं झालेल्या स्पर्धेत विदर्भाने शेष भारताचा ९३ धावांनी पराभव करत तिसऱ्यांदा इराणी चषकावर नाव कोरल आहे.  हा सामना विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर दिनांक १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान खेळला गेला. शेष भारताचा दुसरा डाव २६७ धावांवर गुंडाळून विदर्भाच्या संघानं हे यश मिळवलं. अथर्व तायडेने पहिल्या डावात १४३ धावांची शानदार खेळी करत सामनावीर पुरस्कार पटकावला. तर गोलंदाज हर्ष दुबेने दुसऱ्या डावात चार बळी घेतले. २०२४- २५ च्या रणजी चषकावर नाव कोरल्यानंतरचा हा आणखी एक महत्वाचा विजय विदर्भाने आपल्या नावावर केला आहे.

महिला विश्वचषक क्रिकेट

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज,  कोलंबो इथं भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना सुरु आहे. पाकिस्तानच्या संघानं नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्र रक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारतीय संघ ३७ षटकांत ५  बाद १६४ धावांवर खेळत आहे.

दिव्यांग अथलेटिक्स

नवी दिल्लीत झालेल्या दिव्यांगांसाठीच्या अथलेटिक्स स्पर्धांमधे भारतानं काल ३ पदकं जिंकली त्यामुळे आता भारताची पदक संख्या १८ झाली आहे. यामध्ये ६ सुवर्ण, ७ रौप्य आणि ५ कांस्य पदके आहेत. ही भारताची ऐतिहासिक कामगिरी असून पदकतालिकेत भारत सहाव्या स्थानी आहे. सर्वाधिक १२ सुवर्णपदकं ब्राझिलच्या संघाला मिळाली. ९ सुवर्णपदकं मिळवून चीन दुसऱ्या तर ८ पदक मिळवून पोलंड तिसऱ्या क्रमांकावर राहिला. भारतासाठी प्रमुख पदक विजेत्यांमध्ये महिलांच्या 100 मीटर T12 मध्ये सुवर्ण जिंकणाऱ्या सिमरन शर्मा आणि पुरुषांच्या उंच उडी T47 मध्ये सुवर्ण जिंकणाऱ्या निशाद कुमार यांचा समावेश आहे.

## अनुकंपा नियुक्ती

वाशीम जिल्ह्यात सर्वसमावेशक सुधारित अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार ४९ उमेदवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त ४६ उमेदवारांच्या नियुक्तीपत्र वितरणाचा जिल्हास्तरीय रोजगार मेळावा काल आयोजित करण्यात आला होता. या मध्ये वाशिम जिल्ह्यातील विविध विभागांमध्ये २० राज्य शासनाचे, २० जिल्हा परिषदेचे आणि ९ पोलीस विभागातील अशा ४९ उमेदवारांना अनुकंपा भरतीतून नियुक्ती पत्र दिले गेले. त्याचबरोबर एमपीएससीच्या लिपिक टंकलेखक भरतीअंतर्गत ४८ उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात आली आहेत .

## हवामान

ईशान्य अरबी समुद्रात निर्माण झालेल्या शक्ती या चक्रीवादळाची तीव्रता वाढत असून पुढच्या काही दिवसात ते अधिक शक्तिशाली होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. ७ ऑक्टोबरपर्यंत उत्तर कोकण किनारपट्टी भागात जोरदार वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान भंडारा जिल्ह्यात आठ दिवसाच्या विश्रांती नंतर आज वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली आहे. धान पीक काही दिवसात कापणीला येणार असल्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. आज नागपूर जिल्ह्याच्या काही भागात दुपारी पावसानं हजेरी लावली. आगामी काही तासांत भंडारा, वर्धा, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर आणि गोंदिया जिल्ह्यांतील काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

*****